# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.६ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थ्यांचा स्थानिक माध्यम अभ्यासदौरा नुकताच पार पडला. यात विद्यार्थ्यांनी पोलिस अधिक्षक कार्यालय, मु.जे महाविद्यालयातील मनभावन कम्युनिटी रेडिओ स्टेशन, सायंदैनिक साईमत आणि दैनिक देशदूतच्या कार्यालयाला भेटी देवून कार्यप्रणाली आणि कामकाजाविषयी माहिती जाणून घेतली.

माध्यमशास्त्र प्रशाळेतील एम.एम.सी.जे द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा अभ्यासदौरा प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.सुधीर भटकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ४ फेब्रुवारी २०२३ रोजी आयोजित करण्यात आला होता. सुरूवातीला मु.जे महाविद्यालयातील मनभावन कम्युनिटी रेडिओ स्टेशनला भेट दिली. यावेळी रेडिओ स्टेशन प्रमुख अमोल देशमुख, आरजे स्वामी पाटील यांनी रेडिओ कार्यक्रम निर्मिती व प्रसारण याबाबत माहिती दिली. त्यानंतर अप्पर पोलिस अधिक्षक चंद्रकांत गवळी यांची भेट घेवून पोलिस प्रशासनाच्या कार्यप्रणाली विषयी विद्यार्थ्यांनी सविस्तर माहिती जाणून घेतली. कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस प्रशासनासह जनतेची तेवढीच महत्वाची भूमिका आहे. सामाजिक सलोखा निर्माण होण्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्ती पोलिसमित्र असायला हवा असे मत व्यक्त करून अप्पर पोलिस अधिक्षक गवळी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. दुपारच्या सत्रात औद्योगिक वसाहत येथील सायंदैनिक साईमत कार्यालयाला भेट दिल्यानंतर संचालक परेश ब-हाटे, ज्येष्ठ पत्रकार हेमंत काळुंखे, राकेश कोल्हे, प्रकाश पाटील यांनी वृत्तपत्र निर्मितीसह छपाई तंत्राची माहिती दिली. त्यानंतर दैनिक देशदूतच्या मुख्य कार्यालयास भेट देवून वृत्तपत्र निर्मितीची कार्यप्रणाली प्रत्यक्ष समजावून घेतली. यावेळी संपादक हेमंत अलोने यांनी शब्दसाठा ही पत्रकारांची संपत्ती असून विश्वासार्हता महत्वाची असल्याचे सांगितले. त्यांनी वृत्तपत्र निर्मिती, दैनंदिन कामकाज, छपाई तंत्रज्ञान, वृत्तपत्र व्यवस्थापन व वृत्तपत्रांची वितरण प्रणाली याबाबत उदाहरणासह विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी डॉ.गोपी सोरडे, डॉ.रोहित कसबे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

## बातमी नं. २

जळगाव दि.६ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या वतीने **"विदेशी भाषा आणि इंग्रजी संभाषण कौशल्य: करिअरसाठी सर्वोत्तम संधी"** या विषयावर राज्यस्तरीय ऑनलाईन वेबीनार घेण्यात आला.

या वेबीनारमध्ये भाषा प्रशाळेच्या संचालक प्रा. मुक्ता महाजन, जपानी भाषा प्रशिक्षक माया नरसापूर, जर्मन भाषा प्रशिक्षक श्रेया पाठक यांनी मार्गदर्शन केले. विविध जिल्ह्यातून ५० विद्यार्थ्यांनी यात भाग घेतला. विदेशी भाषेत उत्तम भविष्य घडविण्यासाठी भारतीय विद्यार्थ्यांना उत्तम संधी असल्याचे यावेळी सांगण्यात आले. प्रभारी संचालक डॉ. मनीषा इंदाणी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मनीषा जगताप यांनी सूत्रसंचालन केले.

## बातमी नं. ३

जळगाव दि.६ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र प्रशाळेतंर्गत राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दोन दिवसीय नेतृत्व गुण विकास कार्यशाळा घेण्यात आली.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

# जनसंपर्क विभाग

विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा. सुनील कुलकर्णी यांनी कार्यशाळेचे उद्घाटन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रमोद पवार होते. नेतृत्व करण्यासाठी परीश्रम, मेहनत आणि चिकाटी या गुणांची आवश्यकता असल्याचे प्रा. कुलकर्णी म्हणाले. प्राचार्य पवार यांनी न्यूनगंडाची भावना दूर करून विद्यार्थ्यांनी आपल्यातील कौशल्य आणि क्षमता ओळखून विकास साधावा असे आवाहन केले. प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. उमेश गोगडीया यांनी केले. नेहा पाटील हिने सूत्रसंचालन केले. समाधान कुंभार यांनी आभार मानले. पहिल्या सत्रात डॉ. शुभांगी राठी यांनी युवा नेतृत्व आणि सामाजिक विकास या विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात डॉ. तुषार रायसिंग यांनी जी-२० अध्यक्षता आणि भारताचे नेतृत्व या विषयावर मांडणी केली. डॉ. विजय घोरपडे यांनी सामाजिक नेतृत्व जडण-घडणीत विचार आणि विचारवंतांची भूमिका या विषयावर मांडणी केली. या सत्रांचे सूत्रसंचालन भाग्यश्री पाटील, विनेश पावरा, विनोद राजपूत, यांनी केले. प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा. अजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा घेण्यात आली.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: ६ मार्च, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी